## अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल स्पर्धेत विद्यापीठाच्या महिला चमूचे घवघवीत यश

## कुलगुरूंनी केले अभिनंदन

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला चमूने रॉयल ग्लोबल विद्यापीठ, आसाम येथे नुकत्याच संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल महिला स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले असून चमूने रोहीलखंड विद्यापीठ, जळगाव व केरळ विद्यापीठ संघाचा पराभव करत कास्य पदक पटकाविले. सहभागी सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्रभारी कुलगुरू डॉ. विलास भाले व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख तसेच क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे संचालक डॉ. अविनाश असनारे आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचे सर्व सदस्यांनी विद्यापीठाच्यावतीने अभिनंदन केले.

सदर चमूमध्ये डी.सी.पी.ई., अमरावतीची कु. मृणाली ब्रम्हे, कु. श्वेता भिराड, कु. पायल मिस्त्री व कु. लिबानी नाईक, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महा., अमरावतीची कु. आरती सोनवणे, सरस्वती कला महा., दहिहांडाची कु. मयुरी ठाकरे, शंकरलाल खंडेलवाल महा., अकोलाची कु. संध्या शिंदे, श्रीमती केशरबाई लाहोटी महा., अमरावतीची कु. अश्विनी भुजाडे, युवाशक्ती कला व विज्ञान महा., अमरावतीची कु. कोमल मिसळ, कला, वाणिज्य व विज्ञान महा., अमरावतीची कु. पल्लवी सदाशिव व कु. सलोनी सुर्यवंशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महा., अमरावतीची कु. दीक्षा पाटील, श्री शिवाजी विज्ञान महा., अमरावतीची कु. भूमिका आठवले, श्रीमती राधाबाई सारडा महा., अंजनगाव सूर्जीची कु. देव्यानी शेवाळे, तक्षशिला महा., अमरावतीची कु. पल्लवी रामटेके व कु. प्रेरणा इंदुरकर, कला व विज्ञान महा., कामरगांवची कु. दिक्षा किर्डक, विद्याभारती महा., अमरावतीची कु. आंचल धंदर, श्रीमती एल.आर.टी. वाणिज्य महा., अकोलाची कु. रिया डोंगरे व कु. विशाखा हिरोडे, फुलसिंग नाईक महा., पुसदची कु. रोहिणी शिराळे या खेळाडूंचा समावेश होता. प्रशिक्षक म्हणून पंकज कोकाटे यांनी, तर व्यवस्थापक म्हणून डॉ. सतिश मार्डीकर यांनी काम पाहिले. खेळाडूंचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी

दि. १७/०१/२०२२.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी